**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.177, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची सद्यस्थितीत उपयुक्तता

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Abstract**

*एकोणिसाव्या शतकात इंग्रजी राजवटीत नवी प्रशासन यंत्रणा आली. इंगजांनी आपल्या अमलाखालील प्रदेशात पाश्चिमात्य शिक्षणाचा पाया घातला. इंग्रजांच्या शिक्षणविषयक उदार धोरणाने महाराष्ट्रात पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात झाली. परंतु हे शिक्षण समाजातील वरिष्ठ वर्गापुरतेच मर्यादित होते. संपूर्ण एकोणिसाव्या शतकात समाजातील वरचा वर्ग शिक्षणात अग्रेसर राहिला. सामान्य जनतेस शिक्षणाचा अधिकार नव्हता. शूद्र, स्त्रियांना शिक्षण घेता येत नव्हते. अशा या दीन बहुजन समाजाला महात्मा जोतिराव फुले यांच्या रूपाने पहिला वाली मिळाला. अशा या विषमतावादी परंपरेत सामाजिक विषमता मोडीत काढून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक महापुरूप व समाजसुधारकांनी प्रयत्न केले . अशाच महापुरूषाचा जन्म २६ जुलै १८८४ रोजी कोल्हापुर येथे झाला. या लोकनायक, बहुजन उद्धारक महापुरूषाचे नाव राजर्षी छत्रपती शाहू महाराज शाहू महाराजांनी बहुजनांच्या दयनीय अवस्थेस कारणीभूत असणाऱ्या घटकांचा अभ्यास केला. शिक्षणामुळेच बहुजनांचा उद्धार होईल असा मौलिक विचार शाहू महाराजांनी मांडला.*

***की वर्ड:*** *छत्रपती राजर्षी शाहू महाराज, शैक्षणिक कार्य, सामाजिक कार्य, सद्यस्थितीत उपयुक्तता*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

आज आपणास स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली तरीदेखील आपल्या देशातील निम्म्याहून अधिक लोक निरक्षर आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या देशातील शैक्षणिक स्थितीचे अवलोकन करून म्हटले होते. "शिक्षणाचे संदर्भात आमचा गतकाल म्हणजे इतिहासातील एक अखंड काळी रात्र आहे. केवळ एकच जात विद्येचा उपभोग घेत होती. "

शिक्षणाच्या पायावरच सर्व समाजाची उन्नती करता येईल या गोष्टीचे भान ठेवून शाहू महाराजांनी आपल्या काळात सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळावे म्हणून शासनाने 2005 चा शिक्षण हक्क कायदा अमलात आणला. याचे श्रेय शाहू महाराजांकडे जाते. शाहू महाराजांनी शिक्षणाचे बीज तळागाळात रुजविले. विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. म्हणूनच शाहू महाराजांच्या अस्पृश्योद्धार कार्याचा गौरव करताना डॉ.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आंबेडकरांनी म्हटले होते की, “त्यांच्यासारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हाला शंका आहे”.

- **कार्यात्मक व्याख्या**
- **छत्रपती राजर्षी शाहू महाराज**

कोल्हापूर संस्थानात 26 जुलै 1884 ते 6 मे 1922 या कालावधीत होवून गेलेले राजे.

- **शैक्षणिक कार्य**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात शिक्षणक्षेत्रात दिलेले योगदान.

- **सामाजिक कार्य**

शाहूमहाराजांनी त्यांच्या कार्यकाळात सामाजिक प्रगतीसाठी दिलेले योगदान.

- **सद्यस्थितीत उपयुक्तता**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा सद्यस्थितीत दिसून येणारा प्रभाव.

- **स्त्री शिक्षणाचा पुरस्कार**

शाहूमहाराजांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते म्हणूनच ते म्हणत "जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री पुरुषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र समृद्ध एकजीव आणि बलवान होवू शकत नाही". अशाप्रकारे शाहूमहाराजांनी त्याकाळात स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आज इस्लामिक राष्ट्रांचा विचार करता परिस्थिती फारशी वेगळी आहे. असे वाटत नाही. मलालासारख्या मुलीला आजही स्त्रियांच्या शिक्षणासाठी लढावे लागते. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत भारताची स्थिती इस्लामिक राष्ट्रांसारखी नसली तरी सर्व स्तरातील सर्वच स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळतेच असे नाही. अशा स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांचे विचार नक्कीच प्रेरक व मार्गदर्शक ठरतील.

- **शाहूमहाराजांची दूरदृष्टी**

शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने दूरदृष्टी असणारे तळागाळातील जनतेचे लोकराजे होते. ते म्हणत "आपण फक्त शेतकरी आणि शिपाई होवून चालणार नाही, व्यापार उद्योगधंद्यावरही लक्ष घातले पाहिजे. " आज भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशात बेरोजगारांची संख्या वाढतच चालली आहे. तरूण बेरोजगारापायी आलेल्या नैराश्यातून जीवन संपविण्याचा मार्ग अंगीकारत आहेत. अशा तरुणांना स्वयंरोजगार व उद्योगधंदे करण्यासाठी प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. यासाठी शाहू महाराजांचे औद्योगिक शिक्षणासंबंधीचे मौलिक विचार प्रेरणादायी ठरणार आहेत.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

### ➢ अस्पृश्यता निर्मूलन व सामाजिक समतेचा पुरस्कार

शाहू महाराज बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. नागपुरला भर सभेत अस्पृश्याच्या हातून पाणी पिऊन महाराजांनी कृतीने उदाहरण घालून दिले. अस्पृश्यता निर्मूलनासाठी शासन स्तरावर कायदे करण्यात आले मात्र आजही समाजात काही प्रमाणात उघड व छुप्या स्वरूपात जातीयता दिसून येते. याची उदाहरणे म्हणजे अलिकडच्या काळात घडलेली दलित हत्याकांडे व जातीय अत्याचार म्हणूनच आजच्या काळातही सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांचे विचार मार्गदर्शक ठरतील.

आज शिक्षणहक्क कायदयानुसार समाजातील सर्व स्तरातील सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याचा तसेच दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. याच शिक्षणहक्क कायदयाची सुरुवात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन परिस्थितीत केली होती तसेच त्यांनी सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला होता. शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक विचार तसेच त्यांचे कार्य मानवजातीच्या इतिहासान सदैव प्रेरक ठरतील. शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक विचार सद्यस्थितीत अमलात आणून संपूर्ण समाजात समता, बंधूता शांतता पस्थापित होवून भारतीय समाजाचा गौरव व्हावा म्हणून शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक विचार आजही उपयुक्त ठरतात.

### ➢ छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची सद्यस्थितीत गरज

शाहू महाराजांचे विचार व कार्य समाजाभिमुख होणे आवश्यक आहे. शाहू महाराजांनी केवळ शिक्षणावर भर दिला नाही. त्यांनी जीवनाच्या सर्व अंगाचा विचार केला. शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू समाजासमोर आणण्यासाठी प्रस्तुत शोधन गरजेचे आहे. शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट होण्यासाठी तसेच शाहू महाराजांनी पुस्तकी शिक्षणा बरोबरच कौशल्याधिष्टीत शिक्षणाचा पुरस्कार केला. शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. ते जुनाट विचारांना चिकटून राहिले नाहीत. त्यांनी सदैव ज्ञान व विज्ञानाची कास धरली. समाजातील मागास व गरजूंना आरक्षण व सवलती देवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला हे समाजमनावर ठसविण्यासाठी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची सद्यस्थितीत गरज आहे. शाहू महाराजांनी अंगभूत गुण व कला-कौशल्यांना प्रोत्साहन देणारे विचार मांडले. शाहू महाराजांनी मांडलेले स्त्री-पुरूष समानता विषयक विचार, जातीभेद निर्मूलनाबाबतचे विचार, औद्योगिक शिक्षण विषयक विचार सद्यकालीन सामाजिक स्थितीचा विचार करता आजही उपयुक्त आहेत.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**➢ छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे सद्यस्थितीत महत्त्व**

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षण प्रसारासाठी अलौकिक कार्य केले शिक्षणाचे महत्त्व तळागाळातील जन माणसांना पटवून शाहू महाराजांनी त्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. शाहू महाराज दूरदृष्टी असणारे राजे होते. त्यांनी शिक्षणाचा सर्वांगाने विचार केला. शाहू महाराजांनी सांगितलेले स्त्री शिक्षण विषयक विचार, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व सक्तीचे मोफत शिक्षण तसेच समाजातील दुर्बल गरजू घटकांना विशेष सवलती सारख्या योजना, समाजातील तळागाळातील लोकांचा शिक्षणामार्फत विकास घडविणे अशाप्रकारे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शाहू महाराजांचे विचार व कार्य सद्यस्थितीत अमलात आणणे आवश्यक आहे. शाहू महाराजांच्या वरील सर्व विचारांची सद्यकालीन समाजात अत्यंत उपयुक्तता आहे.

**➢ छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे सद्यस्थितीत योगदान**

❖ शाहू महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक विचारांची शिक्षणक्षेत्रात भर पडेल.

❖ शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक विचार कार्याकडे पाहण्याचा अभ्यासकांचा दृष्टीकोन व्यापक होईल.

❖ अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी, समाजसेवकांना शाहू महाराज हे एक आदर्श प्रेरणास्त्रोत ठरतील.

❖ शिक्षणतज्ज्ञांसाठी शाहू महाराज मार्गदर्शक ठरतील.

❖ वंचित व स्त्रियांच्या उन्नतीसाठी शाहू महाराज मार्गदर्शक ठरतील.

❖ सामाजिक कार्यकत्यांनाही सामाजिक कार्यासाठी उपयोग होईल.

❖ समाजाचा समतोल विकास करण्यासाठी सर्वच क्षेत्रात शाहू महाराजांचे शैक्षणिक, सामाजिक विचार उपयुक्त ठरतील.

## संदर्भ

*कीर, ध. (1970). शाहू स्मारक व्याख्यान. (प्रथमावृत्ती) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*
*जाधव, बी. (1971). शाहू महाराजांची भाषणे. ( प्रथमावृत्ती) राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर.*
*जाधव, र. (1998). लोकराजा छत्रपती शाहू. सुरेश एजन्सी, पुणे.*
*भगत, रा. (1981). राजर्षी शाहू शिक्षण विषयक विचार व कार्य. ( प्रथमावृत्ती) चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.*
*वास्कर, पु. (2010). भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण. नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*